# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि२८/०३/२०१८.

## प्रेस नोट

## " श्री हनुमान जयंती " निमित्त वाहतुकीत बदल.

दि.२८/०३/२०१८- ३१ मार्च रोजी श्री हनुमान जयंती असल्याने दि.३०/०३/२०१८ रोजी सायंकाळी पासून खुलताबाद येथे भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी औरंगाबाद शहरातून व परिसरातून मोठ्या प्रमाणात भाविक पायी चालत जाणार आहे. औरंगाबाद-नाशिक तसेच औरंगाबाद-धुळे या महामार्गावर मोठ्या प्रमाणावर जड व इतर वाहनांची वर्दळ असते. पायी चालणाऱ्या भाविकांच्या गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी होण्याची किंवा दुर्दैवाने एखादा अपघात होवून कायदा व सुव्यवस्थाचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच जनतेस अडथळा, धोका, गैरसोय होणार आहे. त्यामुळे सदर रस्त्यावरील वाहतूकचे नियमन करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद-धुळे महामार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक बंदोबस्त प्रभारी अधिकारी आवश्यकतेनुसार वाहतूक वळवतील व मार्गात बदल करतील. जनतेस आवाहन करण्यात येते कि, त्यांनी सदर मार्गाचा वापर शक्यतो टाळावा. नमूद कालावधीत पुढीलप्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करण्यात यावा.

१) औरंगाबाद कडून धुळे, देवगाव रंगारीकडे जाणारी जड वाहने नगरनाका-ए एस क्लब चौक-साजापूर फाटा-करोडी-शरनापूर फाटा-दौलताबाद टी-माळीवाडा-वेरूळ-कसाबखेडा या मार्गाने जातील.

२) धुळे, देवगाव रंगारी कडून औरंगाबाद कडे जाणारी जड वाहने वेरूळ-कसाबखेडा फाटा-माळीवाडा-दौलताबाद टी-शरणापूरफाटा-करोडी-साजापूर फाटा-ए एस क्लब चौक या मार्गाने येतील.

तसेच ही अधिसूचना बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी/कर्मचारी, अग्निशामक दल, रुग्णवाहिका, आरोग्यसेवा, दंडाधिकारी, अत्यावश्यक सेवा यांच्या वाहनास लागू राहणार नाही असे सहा.पोलीस आयुक्त (वाहतूक) सी.डी.शेवगण यांनी कळविले आहे.

SD/-

पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर

करिता